**बृहन्मुंबई महानगरपालिका**

सार्वजनिक आरोग्य खाते

ॲक्वर्थ महानगरपालिका कुष्ठरोग रुग्णालय,वडाळा (प) मुंबई-४०००३१.

क्र. एचओ/ १६५३ /एएलएच दि.०८.०१.२०२४

# जाहिरात

सार्वजनिक आरोग्य खात्यांतर्गत ॲक्वर्थ महानगरपालिका कुष्ठरोग रुग्णालयाच्या आस्थापनेवरील 'वैद्यकीय अधिकारी' या संवर्गातील १ रिक्त पद कंत्राटी पध्दतीने ६ महिन्यांकरीता भरण्यासाठी किंवा नियमित तत्वावर पदे भरेपर्यंत यापैकी जे अगोदर असेल तो पर्यंत यासाठी खाली नमूद केलेली अर्हता धारण केलेल्या उमेदवारांकडून अर्ज मागविण्यात येत आहे.

वैद्यकीय अधिक्षक, ॲक्वर्थ महानगरपालिका कुष्ठरोग रुग्णालय,वडाळा (प) मुंबई -४०० ०३१. येथे दि.०९.०१.२०२४ ते दि.१४.०१.२०२४ रोजी सायंकाळी ४ वाजेपर्यंत अर्ज सादर करावेत. अर्जाची छाननी करुन अर्हता प्राप्त उमेदवारांची एकत्रित गुणवत्ता यादी व निवड यादी दि.१७.०१.२०२४ रोजी दुपारी २ वाजता कार्यालयाच्या सुचनाफलकावर प्रसिध्द केली जाईल.

**कंत्राटी वैद्यकीय अधिकारी पदासाठी शैक्षणिक अर्हता:-**

1.उमेदवाराकडे वैधानिक विद्यापीठाची औषधशास्त्र व शल्यचिकित्सा शास्त्रातील (M.B.B.S.) पदवी धारण केलेली असावी.

1) **प्रथम प्राधान्य**:- उमेदवारने मान्यताप्राप्त विद्यापीठ किंवा संस्थेची मेडीसीन/ त्वचारोग / प्रिव्हेंटीव सोशल मेडिसीन या विषयातील पदव्युत्तर पदवी धारण केलेली असावी.

किंवा

2) **व्दितीय प्राधान्य**:-उमेदवारने त्वचारोग / प्रिव्हेंटीव सोशल मेडिसीन या विषयातील पदव्युत्तर पदविका धारण केलेली असावी

3. उमेदवार महाराष्ट्र मेडिकल कौन्सिलचा नोंदणीकृत असणे आवश्यक आहे.

**सर्वसाधारण अटी व शर्ती:-**

1. त्यांची नेमणूक कंत्राटी तत्वावर निव्वळ तात्पुरत्या स्वरूपात पर्यंत ६ महिन्याच्या कालावधीकरिता राहील.
2. उमेदवाराची कंत्राटी तत्वावरील नेमणूक सहा महिने अथवा वैद्यकीय अधिकारी संवर्गाची रिक्त पदे भरेपर्यंत यापैकी जे आधी होईल इतक्या कालावधीकरीता असेल.
3. उपरोक्त कालावधीत नियमित तत्वावर ॲक्वर्थ महानगरपालिका कुष्ठरोग रुग्णालयाच्या आस्थपनेवरिल वैद्यकीय अधिकारी यांची नियुक्त झाल्यास कंत्राटी वैद्यकीय अधिकारी पदाची सेवा पूर्व सूचना न देता संपूष्टात येईल.
4. निवड झालेल्या उमेदवारास रु.२००/- च्या बॉड पेपरवर करारनामा या कार्यालयास सादर करावा

लागेल.

5. त्यांना दरमहा एकूण रुपये रु.९०,०००/-(रुपये नव्वद हजार फक्त) एवढे वेतन निश्चित करण्यात आलेले आहे. अन्य कोणताही भत्ता दिला जाणार नाही.

6. आवश्यकतेनुसार सदर उमेदवारांना रुग्णालयात तिन्ही पाळीमध्ये काम करावे लागेल.

7. त्यांना कंत्राटी कालावधीत कोणत्याही रजा अनुज्ञेय राहणार नाही.

8. सदर उमेदवारासाठी निवासस्थानांची व्यवस्था केली जाणार नाही.

9. त्यांना कंत्राटी कालावधीत त्यांचे काम समाधानकारक न आढळल्यास कोणतिही पूर्वसुचना न देता त्यांची सेवा समाप्त केली जाईल.

10. त्यांची नेमणुक करार पध्दतीची असल्याने त्यांना कोणत्याही न्यायालयात जाता येणार नाही.

11. बृहन्मुंबई महानगरपालिका सेवा नियमावली अटी व शर्ती खाली ही नेमणुक झाली नसल्यामुळे त्या अनुषंगाने मिळणारे निवृत्ती वेतन, भविष्य निर्वाह निधी अथवा तत्सम कोणत्याही प्रकारचे लाभ मिळण्यास ते पात्र राहणार नाहीत. अथवा त्या पदावर नेमणूक केली आहे त्या पदावरील नियुक्तीच्या दिनांकापासून मिळणारे कोणत्याही प्रकारचे फायदे मिळणार नाहीत.

सही/-

कार्यकारी अरोग्य अधिकारी.